**क्रमांक : मुद्रांक–१३८९/३५९८/प्र.क्र.७६९/म–१** **महसूल व वन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई – ४०००३२**
**दिनांक : १९ सप्टेंबर १९९१**

**प्रति,**

**मुद्रांक अधिक्षक,**
**प्रधान मुद्रांक कार्यालय,**
**फोर्ट, मुंबई.**

**विषय :–** **भाडेपट्टयाच्या दस्तावर ज्यादा भरलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा. चारकोप सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्यादित), मुंबई.**

**संदर्भ :–** **वरील विषयासंबंधीचे आपले अ.शा.प.क्र. अेडीजे/एसआर/ चा.को/ एस/५२९७, दिनांक २/८/१९९१.**

२. महाराष्ट्र अधिनियम क्र.९/१९९० अन्वये, मुंबई मुद्रांक कायदयातील अनुसूची १ मधील अनुच्छेद २५ (ड) मधे दिनांक १७.३.१९८८ पासून पुर्वलक्षीप्रभावाने मुद्रांक शुल्काचे सवलतीचे दर विहीत केलेले आहेत. त्यामुळे शासन परि. महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक - १०९०/प्र.क्र.३४५/ म-१, दिनांक २६-६-१९९० अन्वये ज्या दस्तांच्या संदर्भात दिनांक १७/३/१९८८ नंतर सवलतीच्या दराऐवजी पूर्ण मुद्रांक शुल्क दिलेले आहेत. अशा प्रकरणी जास्तीच्या दिलेल्या मुद्रांकाचा परतावा मंजूर करण्यासंबंधी सविस्तर आदेश दिलेले आहेत.

३. अनुच्छेद २५ (ह) मधील सवलतीचे दर हे अनुसूची - एक मधील इतर समांतर अशा अनुच्छेद ३२, ३३, ३४, ३६ इत्यादी लेख्यांना सुध्दा (Instruments ) लागू आहेत. त्यामुळे हया दस्तांवर देखील सवलतीच्या दराऐवजी जास्तीत जास्त मुद्रांक शुल्क वसूल केले असल्यास ते संबंधितांना परत करावे लागतील. सबब शासनाने असा निर्णय घेतला आहे की, शासन परि. दि. २६/६/१९९० मध्ये दिलेल्या विहीत कार्यपध्दतीनुसार भाडेपट्टयाच्या दस्तावरील जास्तीच्या दिलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा मंजूर करण्यात यावा. तद्नुसार चारकोप सह. गृहनिर्माण संस्थांची भाडेपट्टयाच्या दस्ताच्या संदर्भातील परताव्याची प्रलंबीत प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. ही प्रकरणे केवळ दिनांक १७/३/१९८८ ते दिनांक ७/२/१९९० या कालावधीसाठीच मर्यादीत राहतील याची नोंद घेण्यात यावी.

**सही/-**
**(मा.स. जोशी)**
**कक्ष अधिकारी**
**महसूल व वन विभाग**

ही प्रकरणे केवळ दिनांक १७.३.१९८८ ते दिनांक ७.२.१९९० या कालावधीसाठीच मर्यादित राहतील यांची नोंद घेण्यांत यावी.

**सही/-**
**(क.आ. सातदिवे)**
**उप नोंदणी महानिरीक्षक, म.रा.**
**पुणे.**

**प्रत :-**

**सर्व सह जिल्हा निबंधक यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.**